चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000

**BOOKLET No.**

## प्रश्नपुस्तिका

**Paper 5**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 50

एकूण गुण : 100

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

चाणक्य मंडल परिवार

1) राष्ट्रपती निवडणुकीच्या निर्वाचक गणात दिल्ली आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभेतील निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश खालील कोणत्या घटनादुरुस्ती अन्वये करण्यात आला?

1) 68 वी घटनादुरुस्ती
2) 69 वी घटनादुरुस्ती
3) 71 वी घटनादुरुस्ती
4) 70 वी घटनादुरुस्ती

Under which of the following constitutional amendments, the elected members of the Legislative Assemblies of the Union Territories of Delhi and Puducherry were included in the electorate for the Presidential election?

1) 68th Amendment
2) 69th Amendment
3) 71st Amendment
4) 70th Amendment

---

2) संसदेच्या दोन्ही गृहाच्या संयुक्त बैठकीत उपराष्ट्रपती पदाची निवडणूक घ्यावी अशी राज्यघटनेत सुरुवातीला असलेली तरतूद खालील कोणत्या घटनादुरुस्तीने काढून टाकण्यात आली?

1) 17 वी घटनादुरुस्ती
2) 21 वी घटनादुरुस्ती
3) 11 वी घटनादुरुस्ती
4) 7 वी घटनादुरुस्ती

Which of the following constitutional amendments removed the initial provision in the Constitution that the election of the Vice President should be held in a joint sitting of both the Houses of the Parliament?

1) 17th Amendment
2) 21st Amendment
3) 11th Amendment
4) 7th Amendment

---

3) भारताच्या उपराष्ट्रपतीबाबत पुढील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने ओळखा.

अ) उपराष्ट्रपतीची निवड दोन्ही सभागृहांच्या केवळ निर्वाचित सदस्यांच्या निवड मंडळाकडून केली जाते.

ब) निवड मंडळ (Electoral College) अपूर्ण होते या कारणास्तव उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीला आव्हान देता येत नाही.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही नाहीत

Consider the following statements about the Vice President of India and identify the correct statement/s.

a) The Vice-President is elected by a selection board of only elected members of both the Houses.

b) Challenging the election of the Vice President on the grounds that the electoral college was incomplete Cannot be given.

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b



चाणक्य मंडळ परिवार

4) पुढील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने ओळखा.

अ) राजीनामा, पदच्युती, मृत्यू किंवा इतर कारणांमुळे राष्ट्रपती पद रिक्त झाल्यास उपराष्ट्रपती प्रभारी राष्ट्रपती म्हणून एका वर्षापर्यंत राष्ट्रपतींचे काम पाहतो.

ब) व्ही. व्ही. गिरी आणि बी. डी. जत्ती यांनी प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम केले आहे.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त ब

3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाहीत

Consider the following statements and identify the correct statement/s.

a) If the office of the President becomes vacant due to resignation, impeachment, death or other reasons, the Vice President acts as acting President for one year.

b) V. V. Giri and B. D. Jatti has served as the in-charge president.

Alternative Answers:

1) a only 2) b only

3) Both a and b 4) Neither a nor b

---

5) उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकी संबंधी पुढील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने ओळखा.

अ) उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी किमान 20 मतदार हे प्रस्तावक आणि 20 मतदार हे अनुमोदक असणे आवश्यक आहे.

ब) उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना सहभागी करून घेण्याची आवश्यकता नाही असे पंडित नेहरू म्हणाले होते.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त ब

3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

Consider the following statements regarding the election of Vice President and identify the correct statement/s.

a) For election to the post of Vice President, at least 20 voters must be proposers and 20 voters must be approvers.

b) Pandit Nehru had said that there is no need to involve the members of the state legislatures in the elections for the post of Vice President.

Alternative Answers:

1) a only 2) b only

3) Both a and b 4) Neither a nor b

6) योग्य कालानुक्रम लावा - (भारताचे उपराष्ट्रपती)

अ) के. आर. नारायणन
ब) डॉ. शंकर दयाळ शर्मा
क) व्ही. व्ही. गिरी
ड) एम.हिदायतुल्ला

पर्यायी उत्तरे :

1) क, ड, ब, अ
2) ड, क, ब, अ
3) ड, ब, क, अ
4) ड, ब, अ, क

Arrange the following Vice President of India in chronological order.

a) K.R. Narayanan
b) Dr. Shankar Dayal Sharma
c) V.V. Giri
d) M. Hidayatullah

Alternative answers:

1) c, d, b, a
2) d, c, b, a
3) d, b, c, a
4) d, b, a, c

---

7) योग्य जोड्या/डी ओळखा.

अ) कलम 67 - उपराष्ट्रपती पदाची निवडणूक
ब) कलम 66 - उपराष्ट्रपतीचा कार्यकाळ

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाहीत

Identify the correct pairs/d.

a) Article 67 - Election to the post of Vice President
b) Article 66 - Tenure of Vice President

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

---

8) पुढील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने ओळखा.

अ) उपराष्ट्रपती पदावर कार्यरत असताना मृत्यू पावलेले कृष्णकांत हे एकमेव व्यक्ती आहेत.
ब) उपराष्ट्रपती पदाचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर आतापर्यंत सहा व्यक्तींनी राष्ट्रपती म्हणून कार्य केले आहे.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही

Consider the following statements and identify the correct statement/s.

a) Krishnakanth is the only person who died while holding the post of Vice President.
b) So far six persons have served as President after completing the term of office of Vice President.

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

9) अध्यादेश जारी करण्याच्या भारताच्या राष्ट्रपतींच्या अधिकाराबाबत खालीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहे/त?
1) राष्ट्रपती पंतप्रधानाच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच अध्यादेश काढू शकतो.
2) राष्ट्रपतीचा अध्यादेश अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेत येत नाही.
3) दोन्ही बरोबर
4) वरीलपैकी एकही नाही
Which of the following statement/s is/are correct regarding the power of the President of India to issue ordinances?
1) The President can issue ordinances only on the advice of the Cabinet headed by the Prime Minister.
2) Ordinance power of the President is not subject to judicial review.
3) Both are correct
4) None of the above

---

10) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?
1) सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती अधिकार हा राष्ट्रपतींचा न्यायिक अधिकार आहे.
2) वित्त आयोगाची स्थापना करणे हा राष्ट्रपतीचा कार्यकारी अधिकार आहे.
3) दोन्ही बरोबर
4) वरीलपैकी एकही नाही
Which of the following statement/s is/are correct?
1) The power to appoint Chief Justices of the Supreme Court and High Courts is a judicial power of the President.
2) It is an executive power of the President to establish the Finance Commission.
3) Both are correct
4) None of the above

---

11) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?
अ) भारताचे राष्ट्रपती उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची तात्पुरत्या कालावधीसाठी सर्वोच्च न्यायालयाचे तदर्थ न्यायाधीश म्हणून नियुक्ती करू शकतात.
ब) राष्ट्रपतीच्या संमतीने सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश निवृत्त न्यायाधीशाची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती करू शकतो.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ    2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब    4) दोन्ही अ व ब नाही
Which of the given following statement/s is/are correct?
a) The President of India may appoint a Judge of a High Court as an Ad Hoc Judge of the Supreme Court for a temporary period.
b) The Chief Justice of the Supreme Court may appoint a retired judge to the Supreme Court with the concurrence of the President.
Alternative Answers:
1) a only    2) b only
3) both a and b    4) neither a nor b



चाणक्य मंडल परिवार

12) खालील विधाने विचारात घ्या.

अ) राष्ट्रपती पद रिक्त झाल्यास नवीन राष्ट्रपतींची निवडणूक होई पर्यंत उपराष्ट्रपती 6 महिन्यांच्या कालावधी पर्यंत राष्ट्रपती म्हणून कार्य करतो.

ब) उपराष्ट्रपती पद रिक्त झाल्यास ते पद भरण्यासाठी निवडणूक 6 महिन्यांच्या कालावधी नंतर सुद्धा घेतली जाऊ शकते.

क) राष्ट्रपती निवडणुकीप्रमाणे उपराष्ट्रपतीची निवडणूक सुद्धा गुप्त मतदान पद्धतीने केली जाते.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/ने योग्य आहे/त?

पर्यायी उत्तरे :

1) अ आणि क  2) अ, ब आणि क

3) केवळ अ  4) केवळ क

Consider the following statements.

a) In the event of a vacancy in the office of the President, the Vice President acts as President for a period of 6 months until the election of a new President.

b) If the post of Vice President becomes vacant, an election to fill that post may be held even after a period of 6 months.

C) Like the Presidential election, the election of the Vice President is also conducted by secret ballot.

Which of the above statement/s is/are correct?

Alternative Answers:

1) a and c  2) a, b and c

3) only a  4) only c

---

13) राष्ट्रपती राजवट (कलम 356) संदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा.

अ) राष्ट्रपती राजवट लागू असलेल्या राज्यात राष्ट्रपती राजवट कमाल 3 वर्षापर्यंतच लागू राहते.

ब) 42वी घटनादुरुस्ती, 1976 अन्वये कलम 356 नुसार राष्ट्रपती राजवट वाढविण्याचा 6 महिन्याचा असलेला कालावधी एका वर्षापर्यंत वाढविण्यात आला.

क) 44 वी घटनादुरुस्ती, 1978 अन्वये ही तरतूद रद्द करण्यात आली.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ, ब  2) फक्त ब

3) फक्त अ  4) वरीलपैकी एकही नाही

Identify the incorrect statement/s among the following regarding the President's Rule (Article 356) .

a) President's rule remains in force for a maximum of 3 years in a state where President's rule is in force.

b) By the 42nd Constitutional Amendment, 1976, the period of extension of President's rule from 6 months was extended to one year under Article 356.

c) This provision was repealed by the 44th Amendment, 1978.

Alternative Answers:

1) a, b only  2) b only

3) a only  4) none of the above

14) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?
अ) संसदेने संमत केलेल्या व राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आलेल्या विधेयकांसंबंधी राष्ट्रपती सशर्त नकाराधीकार वापरू शकतात.
ब) राष्ट्रपतीचा 12 सदस्यांना राज्यसभेत नामनिर्देशित करण्याचा अधिकार हा कार्यकारी अधिकार आहे.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही
Which of the given following statement/s is/are correct?
a) The President can exercise qualified veto power in respect of bills passed by the Parliament and sent for the President's signature.
b) The power of the President to nominate 12 members to the Rajya Sabha is an executive power.
Alternative Answers:
1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

---

15) योग्य जोडी ओळखा.
1) राष्ट्रपतींच्या निवडणुकी संबंधी बाबी - कलम 71
2) राष्ट्रपतीची निवडणूक - कलम 55
3) राष्ट्रपती पदासाठी पात्रता - कलम 57
4) राष्ट्रपतीच्या निवडणुकीची पद्धत - कलम 54
Identify the correct pair.
1) Matters relating to the election of the President - Article 71
2) Election of the President - Article 55
3) Qualification for the office of President – Article 57
4) Method of Election of the President - Article 54

---

16) खालीलपैकी कोणत्या विधेयक/विधेयकाना लोकसभेत सादर करण्यासाठी राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नाही?
अ) विनियोग विधेयक
ब) वित्तीय विधेयक (1)
क) धन विधेयक
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ
2) फक्त ब, क
3) वरीलपैकी सर्व
4) फक्त अ, क
Which of the following Bills does not require the prior assent of the President to be introduced in the Lok Sabha?
a) Appropriation Bill
b) Finance Bill (1)
c) Money Bill
Alternative Answers:
1) a only
2) b, c only
3) all of the above
4) a, c only

17) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक राष्ट्रपतीद्वारे केली जाते.

ब) केंद्रीय माहिती आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक राष्ट्रपतीद्वारे केली जाते.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ    2) फक्त ब

3) दोन्ही अ व ब    4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) The Chairman of the National Commission for Minorities is appointed by the President.

b) The Chairman of the Central Information Commission is appointed by the President.

Alternative Answers:

1) a only    2) b only

3) both a and b    4) neither a nor b

---

18) पुढील विधाने विचारात घ्या.

अ) ज्यावेळी कोणत्याच पक्षाला लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळत नाही त्यावेळी पंतप्रधानाच्या निवडीसाठी व नियुक्तीसाठी राष्ट्रपती स्वविवेकाधिकार वापरू शकतो.

ब) मन्रो यांनी पंतप्रधानचे वर्णन राज्याच्या नौकेचा कप्तान असे केले आहे

क) पंतप्रधानांना संसदेचा सदस्य म्हणून मिळणारे वेतन व भत्ता दिला जातो.

सत्य विधान/ने ओळखा.

1) फक्त क    2) फक्त ब

3) फक्त अ    4) सर्व विधाने बरोबर आहे

Consider the following statements.

a) The President can exercise his discretionary power to select and appoint the Prime Minister whenever any party has not a clear majority in the Lok Sabha.

b) Monroe described the Prime Minister as the captain of the ship of state

c) Prime Minister is paid salary and allowances as a member of Parliament.

Identify the true statement/s.

1) c only    2) b only

3) only a    4) all the statements are correct

19) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) राष्ट्रपती प्रमाणे उपराष्ट्रपतीचे चे वेतन निश्चित आहे.

ब) राज्यघटनेत उपराष्ट्रपतीला पदावरून मुक्त करण्याचे कारण सांगितले आहे.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त ब

3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) Like the President, the salary of the Vice President is fixed.

b) The Constitution provides the reasons for the removal of the Vice President from office.

Alternative Answers:

1) a only 2) b only

3) both a and b 4) neither a nor b

---

20) पुढील विधाने विचारात घ्या.

अ) राष्ट्रपती विरुद्ध महाभियोग प्रक्रिया संसदेच्या ज्या गृहात सुरू करायची असते त्या गृहाच्या एक - चतुर्थांश सदस्यांनी आरोपपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

ब) राष्ट्रपतींना पदावरून दूर करण्यासाठी महाभियोग ठरावास संसदेच्या बहुमताची आवश्यकता असते.

क) महाभियोग एक अर्ध-न्यायिक प्रक्रिया आहे.

योग्य विधान/ने निवडा.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब

3) फक्त क 4) फक्त अ, क

Consider the following statements.

a) One-fourth of the members of the House of Parliament in which the impeachment proceedings against the President are to be initiated must sign the bill of impeachment.

b) A resolution of impeachment requires a majority vote of Parliament to remove the President from office.

c) Impeachment is a quasi-judicial process.

Choose the correct statement/s.

1) a, b only 2) b only

3) c only 4) a, c only

21) खालील कोणत्या तरतुदींचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत आहे?
अ) उपराष्ट्रपती पदाचा कार्यकाळ
ब) उपराष्ट्रपतीला पदावरून काढण्याची महाभियोग प्रक्रिया
क) आजारपणामुळे राष्ट्रपती कामे करू शकत नसताना उपराष्ट्रपती राष्ट्रपतींची कामे पार पाडतील.
खालील पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा:
1) फक्त अ आणि ब 2) फक्त अ आणि क
3) फक्त ब आणि क 4) वरीलपैकी सर्व
Which of the following provisions is/are mentioned in the Constitution of India?
a) Tenure of office of Vice President
b) Procedure for removing the Vice President from office
c) The Vice President shall perform the duties of the President when the President is unable to perform the duties due to illness.
Choose the correct answer from the following options:
1) a and b only 2) a and c only
3) b and c only 4) all of the above

---

22) खालीलपैकी कोणाची नियुक्ती राष्ट्रपतींच्या आदेशाने त्याच्या सहीशिक्क्यानिशी होते?
अ) महालेखापरिक्षक व नियंत्रक
ब) महान्यायवादी
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही
Who among the following is appointed by order of the President with his signature and seal?
a) Auditor General and Comptroller
B) Attorney General
Alternative Answers:
1) a only 2) b only
3) both a and b 4) neither a nor b

---

23) पंतप्रधानाबाबत खालीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहे/त?
अ) पंतप्रधानांचा कार्यकाळ हा निश्चित नाही.
ब) पंतप्रधान हा संसदेच्या लोकसभा किंवा राज्यसभेचा सदस्य असतो.
क) राज्यघटनेतील कलम 74 अन्वये राष्ट्रपती पंतप्रधानांची नियुक्ती करतात.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त ब 2) फक्त अ आणि ब
3) फक्त ब आणि क 4) वरीलपैकी सर्व
Which of the following statement/s about the Prime Minister is/are correct?
a) The tenure of the Prime Minister is not fixed.
b) The Prime Minister is a member of the Lok Sabha or Rajya Sabha of Parliament.
c) The President appoints the Prime Minister under Article 74 of the Constitution.
Alternative Answers:
1) b only 2) a and b only
3) b and c only 4) all of the above

24) घटनेच्या कलम 74 मध्ये खालीलपैकी कोणती तरतूद करण्यात आली आहे?

1) मंत्रिमंडळ सामूहिकरित्या लोकसभेला जबाबदार असेल.

2) पंतप्रधान राष्ट्रपतींकडून नियुक्त केले जातात.

3) मंत्रिमंडळातील पंतप्रधानांसहीत एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्यांच्या 15% पेक्षा अधिक असणार नाही.

4) राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्याकरता मंत्रिमंडळ असेल

Which of the following provision is made in Article 74 of the Constitution?

1) The Cabinet is collectively responsible to the Lok Sabha.

2) The Prime Minister is appointed by the President.

3) The total number of Ministers including the Prime Minister in the Cabinet shall not exceed 15% of the total members of the Lok Sabha.

4) There shall be a Council of Minister to assist and advise the President

---

25) खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

अ) कलम 53 नुसार, भारतीय संघराज्याचे कार्यकारी अधिकार राष्ट्रपतींकडे असतात.

ब) राष्ट्रपती निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून संसद सदस्यांचे अपात्रतेविषयीचे निर्णय घेऊ शकतो.

क) राष्ट्रपती आंतरराज्यीय परिषद स्थापन करू शकतो.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त अ, ब

3) फक्त ब, क 4) वरीलपैकी सर्व

Identify the correct statement/s from the following.

a) According to Article 53, the executive powers of the Indian Union are vested in the President.

b) The President may take decisions on the disqualification of Members of Parliament in consultation with the Election Commission.

c) The President may constitute an Inter-State Council.

Alternative Answers:

1) a only 2) a, b only

3) b, c only 4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

26) पुढील विधाने विचारात घ्या.

अ) जेव्हा संसदेच्या दोन्ही गृहाचे अधिवेशन चालू नसते तेव्हाच राष्ट्रपती अध्यादेश काढू शकतो.

ब) संसद ज्या विषयावर कायदा करू शकते त्याच विषयावर राष्ट्रपती अध्यादेश काढू शकतात.

क) अध्यादेशाचा कमाल कालावधी सहा महिने सहा आठवडे इतका असतो.

पर्यायी उत्तरे :

1) सर्व विधाने योग्य आहेत
2) सर्व विधाने अयोग्य आहेत
3) फक्त ब व क योग्य
4) फक्त क योग्य

Consider the following statements.

a) The President can issue ordinances only when both the Houses of Parliament are not in session.

b) The President can issue an ordinance on the same subject as the Parliament can legislate..

c) The maximum duration of the ordinance is six months and six weeks.

Alternative Answers:

1) all the statements are correct
2) all the statements are incorrect
3) only b and c are correct
4) only c is correct

---

27) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) हंगामी सरन्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती द्वारे केली जाते.

ब) राष्ट्रपतीच्या संमतीने सर्वोच्च न्यायालय आपल्या कामाची पद्धती व प्रक्रिया यांचे नियमन करण्यासाठी नियम बनवू शकते.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) Acting Chief Justice is appointed by the President.

b) The Supreme Court may, with the concurrence of the President, make rules to regulate the manner and procedure of its work.

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b



चाणक्य मंडल परिवार

28) खालीलपैकी कोणत्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतीच्या अध्यादेश काढण्याच्या खात्रीबाबत गैरउद्देशाच्या कारणावरून न्यायालयात आव्हान देते येते असे म्हटले आहे?

पर्यायी उत्तरे :

1) डी .सी. वाधवा खटला
2) कूपर खटला
3) राजनारायण खटला
4) रघुनाथ राव खटला

In which of the following cases the Supreme Court has held that the validity of the President's Ordinance can be challenged in court on the ground of mala fide?

Alternative Answers:

1) D.C. Wadhwa case
2) Cooper case
3) Rajnarayan case
4) Raghunath Rao case

---

29) खालीलपैकी राज्यघटनेतील कोणत्या कलमा नुसार भारत सरकारच्या सर्व कृती राष्ट्रपतीच्या नावाने केल्या आहेत असे अभिव्यक्त केले आहे?

1) कलम 75
2) कलम 78
3) कलम 77
4) कलम 53

Which of the following articles of the Constitution states that all the acts of the Government of India are done in the name of the President?

1) Article 75
2) Article 78
3) Article 77
4) Article 53

---

30) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) लोकसभा विसर्जित झाल्यावर मंत्रिमंडळ पदावरून दूर होते.

ब) राज्यघटनेतील कलम 74 नुसार मंत्रिमंडळाने राष्ट्रपतीला दिलेल्या सल्ल्याबाबत कोणत्याही न्यायालयात प्रश्न उपस्थित करता येत नाही.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) The Cabinet is removed from office when the Lok Sabha is dissolved.

b) As per Article 74 of the Constitution no question can be raised in any court regarding the advice given by the Cabinet to the President.

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

31) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) एन. संजीव रेड्डी हे आतापर्यंत बिनविरोध निवडून येणारे एकमेव राष्ट्रपती आहेत.

ब) व्ही. व्ही. गिरी सर्वात कमी मतांनी निवडून आलेले राष्ट्रपती आहेत.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

A) N. Sanjeev Reddy is the only President so far to be elected unopposed.

B) V. V. Giri is the President elected with the lowest number of votes.

Alternative Answers:

1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

---

32) योग्य विधाने ओळखा.

अ) राज्यघटनेचा भंग या कारणावरून राष्ट्रपतीस त्याच्या पदावरून दूर करता येते.

ब) राष्ट्रपतीला पदावरून दूर करण्यासाठी महाभियोगाचा ठराव दोन तृतीयांश बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे.

क) महाभियोगासंबंधीची प्रक्रियेची सुरुवात कोणत्याही सभागृहातून सुरू केली जाऊ शकते.

पर्यायी उत्तरे :

1) अ व ब
2) ब व क
3) अ व क
4) वरीलपैकी सर्व

Identify the correct statements.

a) The President can be removed from office on grounds of violation of the Constitution.

b) A two-thirds majority vote is required to impeach the President to remove him from office.

c) Impeachment proceedings can be initiated from either House.

Alternative Answers:

1) a and b
2) b and c
3) a and c
4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

33) योग्य विधाने ओळखा.

अ) राष्ट्रपती राज्यसभा सभापती व उपसभापतीचे पद रिक्त असल्यास त्या पदावर इतर व्यक्तीची नेमणूक करतात.

ब) राष्ट्रपती देशातील कोणत्याही क्षेत्राला अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित करू शकतो.

क) धनविधेयक संसदेत मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींची पूर्वसंमती आवश्यक नसते.

ड) भारताचे महान्यायवादी राष्ट्रपतीच्या मर्जीने पद धारण करतात.

1) अ, ब आणि क योग्य
2) ब, क आणि ड योग्य
3) अ, ब आणि ड योग्य
4) वरीलपैकी सर्व योग्य

Identify the correct statements.

a) The President appoints another person to the post of Rajya Sabha Speaker and Deputy Speaker if vacant.

b) The President can designate any area in the country as a Scheduled Area.

c) Prior assent of the President is not required before introducing the money bill in the Parliament.

d) The Attorney General of India holds office at the pleasure of the President.

1) a, b and c are correct
2) b, c and d are correct
3) a, b and d are correct
4) all of the above are correct

---

34) खालील पदाचा त्यांच्या श्रेष्ठतेनुसार (अग्रक्रम) योग्यक्रम ओळखा.

अ) भारतरत्न प्राप्त व्यक्ती
ब) माजी राष्ट्रपती
क) माजी पंतप्रधान
ड) उपाध्यक्ष निती आयोग

पर्यायी उत्तरे :

1) ब, ड, क, अ
2) ब, अ, ड, क
3) ब, ड, क, अ
4) अ, ब, ड, क

Identify the following terms in the correct order according to their superiority (priority) .

a) Bharat Ratna recipient
b) Former President
c) Former Prime Minister
d) Vice Chairman NITI Aayog

Alternative Answers:

1) b, d, c, a
2) b, a, d, c
3) b, d, c, a
4) a, b, d, c

35) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) राष्ट्रपती अंदमान निकोबार, लक्षद्वीप, दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव या केंद्रशासित प्रदेशांतील सुशासन, शांततेसाठी नियम करू शकतात.

ब) पुद्दूचेरी विधानसभा विसर्जित किंवा निलंबित असेल तेव्हाच राष्ट्रपती पुद्दूचेरीसाठी नियम करू शकतात.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त ब

3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) The President can make rules for good governance, peace in the Union Territories of Andaman and Nicobar, Lakshadweep, Dadra - Nagar Haveli and Daman - Diu.

b) The President can make rules for Puducherry only when the Puducherry Legislative Assembly is dissolved or suspended.

Alternative Answers:

1) a only 2) b only

3) both a and b 4) neither a nor b

---

36) योग्य विधाने ओळखा.

अ) राष्ट्रपती पदाची निवडणूक लढविण्यासाठी घटनेत कमाल वयोमर्यादा ठरवलेली नाही.

ब) राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी अर्ज सादर करताना 50 मतदात्यांचा पाठिंबा तर 30 मतदात्यांचे अनुमोदन आवश्यक असते.

क) राष्ट्रपती राज्यघटनेतील कलम 60 नुसार नमूद केल्याप्रमाणे शपथ देतो.

ड) भारतीय घटनेत उपराष्ट्रपतीचे पद अमेरिकेच्या घटनेवरून घेण्यात आले आहे.

पर्यायी उत्तरे :

1) वरीलपैकी सर्व 2) ब, ड आणि क

3) क, ड आणि अ 4) ब आणि ड

Identify the correct statements.

a) No maximum age limit has been fixed in the constitution for contesting the election of the post of President.

b) The support of 50 voters and the approval of 30 voters are required while submitting an application for the election of the President.

c) The President administers the oath as prescribed under Article 60 of the Constitution.

d) The post of Vice President in the Indian Constitution is taken from the US Constitution.

Alternative Answers:

1) all of the above 2) b, d and c

3) c, d and a 4) b and d



चाणक्य मंडल परिवार

37) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?
अ) भारतीय कायदेमंडळाची रचना कॅनेडियन पद्धतीवर आधारलेली आहे.
ब) राष्ट्रपती कायदेमंडळाचे अविभाज्य भाग आहेत.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब
4) दोन्ही अ व ब नाही
Which of the given following statement/s is/are correct?
a) The structure of the Indian legislature is based on the Canadian model.
b) The President is an integral part of the Legislature.
Alternative Answers:
1) a only
2) b only
3) both a and b
4) neither a nor b

---

38) खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत राष्ट्रपती स्वतःच्या विवेकाने कृती करू शकतो?
अ) लोकसभेत विश्वास सिद्ध न करू शकलेले मंत्रिमंडळ पदच्युत करणे
ब) मंत्रिमंडळाने बहुमत गमावल्यानंतर लोकसभा विसर्जित करणे.
क) लोकसभेत बहुमत नसलेल्या पक्षाच्या प्रमुखाला सत्ता स्थापनेसाठी बोलवणे.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ व ब
2) फक्त ब व क
3) फक्त अ व क
4) वरीलपैकी सर्व
In which of the following circumstances can the President act at his own discretion?
a) Dismissal of the cabinet which fails to prove confidence in the Lok Sabha
b) Dissolution of Lok Sabha after cabinet loses majority.
c) Calling the leader of the party which does not have a majority in the Lok Sabha to form the government.
Alternative Answers:
1) a and b only
2) b and c only
3) a and c only
4) all of the above

---

39) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.
अ) राष्ट्रपतीचा क्षमा करण्याचा अधिकार हा न्यायव्यवस्थेपासून स्वतंत्र नाही.
ब) राष्ट्रपतीचा क्षमा करण्याचा अधिकार हा कार्यकारी विभागीय अधिकार आहे.
क) या अधिकाराचा वापर करताना राष्ट्रपती हे दाद मागण्याचे न्यायालय म्हणून काम करत नाही.
1) वरील सर्व योग्य
2) फक्त अ व ब योग्य
3) फक्त अ व क योग्य
4) फक्त ब व क योग्य
Consider the following statements and choose the correct option.
a) The President's power to pardon is not independent of the Judiciary.
b) The President's power to pardon is an executive departmental power.
c) In exercise of this power the President does not act as an appellate court.
1) all of the above are correct
2) only a and b are correct
3) only a and c are correct
4) only b and c are correct



चाणक्य मंडळ परिवार

40) खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?

अ) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या ठरविण्याचा अधिकार हा राष्ट्रपतीचा स्वेच्छाधिकार आहे.

ब) राष्ट्रपतीच्या क्षमा करण्याच्या अधिकाराचे काही कारणाच्या आधारावर न्यायिक पुनर्विलोकन होऊ शकते.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ  2) फक्त ब
3) दोन्ही अ व ब  4) दोन्ही अ व ब नाही

Which of the given following statement/s is/are correct?

a) Power to decide the total number of judges in the High Courts is a discretionary power of the President

b) The President's power to pardon is subject to judicial review on grounds of some cause.

Alternative Answers:

1) a only  2) b only
3) both a and b  4) neither a nor b

---

41) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.

अ) राज्याने संमत केलेले विधेयक राज्यपालाने राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवल्यास राष्ट्रपती विधेयकाला संमती देऊ शकतो किंवा संमती नाकारू शकतो.

ब) हे विधेयक संमत करून मान्यतेसाठी राष्ट्रपतीला परत सादर केले तर अशा विधेयकाला मान्यता देणे राष्ट्रपतीवर बंधनकारक नाही हे राज्य घटनेत स्पष्ट केलेले आहे.

1) अ योग्य  2) ब योग्य
3) दोन्ही अयोग्य  4) दोन्ही योग्य

Consider the following statements and choose the correct option.

a) If the bill passed by the State is reserved by the Governor for the consideration of the President, the President may give assent or withhold assent to the bill.

b) If the Bill is passed and returned to the President for assent, it is made clear in the Constitution that the President is not bound to assent to such a Bill.

1) a is correct  2) b is correct
3) both are incorrect  4) both are correct

---

42) खालीलपैकी राज्यघटनेच्या कोणत्या कलमात कॅबिनेटचे अधिकार व कार्ये दिलेली आहेत?

1) कलम 75  2) कलम 352
3) कलम 74  4) यापैकी नाही

Which of the following articles of the Constitution gives the powers and functions of the Cabinet?

1) Article 75  2) Article 352
3) Article 74  4) None of these

43) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.
अ) मंत्री म्हणजे मंत्रिमंडळाचा सदस्य व त्यात उपमंत्र्याचाही समावेश होतो असे वेतन व भत्ते कायदा 1952 मध्ये म्हटले आहे.
ब) कॅबिनेटचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक असतो.
1) अ योग्य
2) ब योग्य
3) दोन्ही अयोग्य
4) दोन्ही योग्य
Consider the following statements and choose the correct option.
a) The Pays and Allowances Act, 1952 says that a Minister means a member of the Cabinet and includes a Deputy Minister.
b) The advice of the Cabinet is binding on the President.
1) a is correct
2) b is correct
3) both are incorrect
4) both are correct

---

44) भाषिक अल्पसंख्यांक विशेष अधिकाऱ्या बाबत योग्य विधान/ने निवडा.
अ) घटनेतील भाग 17 च्या कलम 350-B मध्ये त्याचा उल्लेख आहे.
ब) धार्मिक अल्पसंख्याकांसाठीचा विशेष अधिकारी आपला अहवाल संसदेला सादर करतो.
क) 1957 मध्ये हे विशेष पद निर्माण करण्यात आले.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ
2) अ आणि ब
3) अ, ब आणि क
4) अ आणि क
Select the correct statement/s regarding Linguistic Minority Special Officers.
a) It is mentioned in Article 350-b of Part 17 of the Constitution.
b) The Special Officer for Religious Minorities submits his report to the Parliament.
c) This special post was created in 1957.
Alternative Answers:
1) a only
2) a and b
3) a, b and c
4) a and c

---

45) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.
अ) राज्यघटनेतील भाग 17 मधील कलम 350-A हे घटनेतील भाग चार मधील मार्गदर्शक तत्वा व्यतिरिक्तचे इतर मार्गदर्शक तत्व आहे.
ब) कलम 350-A हे भाषिक अल्पसंख्यांक गटातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाशी संबधित आहे.
1) अ योग्य
2) ब योग्य
3) दोन्ही अयोग्य
4) दोन्ही योग्य
Consider the following statements and choose the correct option.
a) Article 350-A of Part 17 of the Constitution is another directive principle apart from Part IV of the Constitution.
b) Article 350-A deals with primary education of children belonging to linguistic minority groups.
1) a is correct
2) b is correct
3) both are incorrect
4) both are correct

46) खालील विधाने विचारात घ्या:

अ) घटनापूर्व काळातील कोणताही तह, करार, संकेत इत्यादी मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतीला सल्ला देणे बंधनकारक असते.

ब) या बाबतीत दिलेले सर्वोच्च न्यायालयाचे मत राष्ट्रपतीवर बंधनकारक असते.

पर्यायी उत्तरे :

1) विधान अ योग्य
2) विधान ब योग्य
3) दोन्हीही विधाने योग्य
4) दोन्हीही विधाने अयोग्य

Consider the following statements:

a) The Supreme Court is obliged to advise the President on any pre-constitutional treaty, agreement, indication etc.

b) The opinion of the Supreme Court in this matter is binding on the President.

Alternative Answers:

1) statement a is correct
2) statement b is correct
3) both statements are correct
4) both statements are incorrect

---

47) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.

अ) राष्ट्रपतीला संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष अथवा सदस्य यांना पदावरून दूर करण्याच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक असतो

ब) निवडणूक आयोगाच्या आयुक्तांचा कार्यकाळ राष्ट्रपती ठरवतात.

1) अ योग्य
2) ब योग्य
3) दोन्ही अयोग्य
4) दोन्ही योग्य

Consider the following statements and choose the correct option.

a) The President is bound by the advice given by the Supreme Court on the removal of the Chairman or member of the Union Public Service Commission from office.

b) The term of office of the Election Commission Commissioner is decided by the President.

1) a is correct
2) b is correct
3) both are incorrect
4) both are correct

---

48) राज्यघटनेतील खालीलपैकी कोणत्या कलमा नुसार पंतप्रधान हे राष्ट्रपती आणि मंत्रीमंडळ यांच्यातील दुवा म्हणून काम करतात?

1) कलम 75
2) कलम 77
3) कलम 74
4) कलम 78

According to which of the following articles in the Constitution, the Prime Minister acts as a link between the President and the Cabinet?

1) Article 75
2) Article 77
3) Article 74
4) Article 78

49) राज्य विधिमंडळाने संमत केलेले धनविधेयक राज्यपाल राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात.
अ) राष्ट्रपती धनविधेयक परत पाठवू शकत नाही.
ब) राष्ट्रपती धनविधेयकला मान्यता राखून ठेवू शकतात.
क) राष्ट्रपती धनविधेयकला मान्यता राखून ठेवू शकत नाही.
वरीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?
1) अ आणि ब 2) ब आणि क
3) अ आणि क 4) वरीलपैकी एकही नाही

A money bill passed by the State Legislature may be reserved by the Governor for the consideration of the President.
a) The President cannot remit the Bill.
b) The President can reserve assent to the money bill.
c) The President cannot withhold assent to a money bill.
Which of the above statements are correct?
1) a and b 2) b and c
3) a and c 4) none of the above

---

50) राष्ट्रपती संबधित खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.
अ) राष्ट्रपती संसदेचा एकात्मिक भाग असल्याने राष्ट्रपतीला संसदीय विशेषाधिकार लागू आहेत.
ब) आंतरराष्ट्रीय पातळीवरचे सर्व करार, वाटाघाटी व निर्णय राष्ट्रपतीच्या वतीने केले जातात.
1) अ योग्य 2) ब योग्य
3) दोन्ही अयोग्य 4) दोन्ही योग्य

Note the following statements about the President and choose the correct option.
a) Parliamentary privileges are applicable to the President as the President is an integral part of the Parliament.
b) All international agreements, negotiations and decisions are made on behalf of the President.
1) a is correct 2) b is correct
3) both are incorrect 4) both are correct

---



चाणक्य मंडल परिवार